# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता.०४/११/२०२०

## अपहरण करणा-या ५ आरोपींचा बिड जिल्हा हद्दीपर्यंत पाठलाग करुन ८ तासाच्या आत अटक करुन अपहरीत इसमाची केली सुटका गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

दिनांक ०३/११/२०२० रोजी सकाळी ०८.०० वा. चे सुमारास पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड नियंत्रण कक्षावरुन इसम नामे राजेंद्र वाघमारे वय ३८ रा. वाल्हेकरवाडी चिंचवड या इसमाचे बलेरो गाडीतुन आलेल्या अज्ञात इसमांनी अपहरण करुन मुंबईच्या दिशेने घेवून गेल्याची माहीती कळविलेने गुन्हे शाखा युनिट २ चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड यांनी स्टाफसह तात्काळ घटनास्थळी पोहचुन प्राथमिक माहीती घेतली असता समजले कि, इसम नामे राजेंद्र बन्सी वाघमारे वय ३४ वर्षे हे पत्नी व दोन मुलांसह कृष्णाई कॉलनी वाल्हेकरवाडी चिंचवड येथे गेले दीड वर्षापासुन राहणेस आहेत. त्यांचे विनोद टेलर्स नावाने दत्तमंदीर समोर सायली कॉम्पलेक्स वाल्हेकरवाडी येथे टेलरींगचे दुकान आहे.सकाळी ६.०० वा.चे सुमारास नेहमीप्रमाणे त्यांचे टेलरींगचे दुकानात कामास गेले असतांना बलेरो गाडी क्रमांक एम एच २५ आर २२४३ मधुन आलेल्या अज्ञात इसमांनी जबरदस्तीने पकडुन गाडीत बसवुन घेवून गेलेची माहीती त्यांचा कामगार वाल्मिक बापू चिंचलवाड याने राजेंद्र वाघमारे यांची पत्नी पार्वती वाघमारे यांना फोन करुन सांगितली म्हणुन त्यांनी चिंचवड पोलीस स्टेशनला माहीती दिली असे समजले सदर प्रकरणामध्ये अधिक माहीती घेतली असता राजेंद्र वाघमारे यांनी बिड जिल्हयातील एका इसमाकडून काही कर्ज घेतले होते व त्यांनीच त्यांचे अपहरण केले असावे अशी माहीती मिळालेने त्या अनुषंगाने तपास करीत असतांना अपहरण करणा-या आरोपीपैकी एका आरोपीचा मोबाईल नंबर मिळाला. सायबर क्राईम विभागाचे सहा.पोलीस निरीक्षक श्री राहूल नाईक यांचेकडून मोबाईल लोकेशनची माहीती घेतली असता आरोपीत हे बिड जिल्हयाच्या दिशेने निघाले असल्याचे निष्पन्न झाले. म्हणुन लागलीच गुन्हे शाखेकडील पोलीस उप निरीक्षक एस डी निलपत्रेवार, पोलीस नाईक जयवंत राऊत, कॉंस्टेबल नामदेव राऊत, नामदेव कापसे असे एक पथक बलेरो गाडीच्या मार्गावर पाठविले. सदर पथकाने सायबर क्राईमकडील सपोनि राहुल नाईक व पोलीस अंमलदार नागेश माळी यांचेकडून वेळोवेळी तांत्रीक माहीती प्राप्त करुन घेवून मोबाईल लोकेशनवर सलग आठ तास सातत्याने पाठलाग करीत बिड जिल्हयातील नेकनुर पोलीस ठाणेच्या हद्दीत आरोपींची बलेरो गाडी क्रमांक एम एच २५ आर २२४३ दिसुन आल्याने भरधाव निघालेल्या बलेरो गाडीचे समोर वाहन आडवे लावुन आरोपींना शिताफीने ताब्यात घेतले व अपहरीत इसम नामे राजेंद्र बन्सी वाघमारे यांची सुखरुप सुटका केली. पकडलेल्या आरोपींना नाव - पत्ता विचारला असता त्यांनी आपली नावे १) गहीनीनाथ बबन कडवकर वय ३२ वर्षे धंदा- शेती रा. बाळापुर पोटारा ता. जि. बिड २) अनिल ध्नराज तांदळे वय ३२ वर्षे धंदा- शेती रा. अंबिल वडगाव पो.पोथरा ता.जि.बिड ३) भाऊराव लहू तांदळे वय ३७ वर्षे धंदा- शेती रा. अंबिल वडगाव पो.पोथरा ता.जि.बिड ४) हनुमंत बन्सी पायाळ वय ४५ वर्षे धंदा- मजुरी रा. सदर ५) बाळु ज्ञानोबा तांदळे वय २३ वर्षे धंदा- शेती रा.तांदळयाचीवाडी पो. येळमघाट ता.जि.बिड अशी असल्याची सांगितली त्यांचेकडे गुन्हयाबाबत विचारपुस करता त्यांनी आर्थीक देवाण-घेवाण मधुन अपहरण केल्याची कबुली दिली. नेकनुर पोलीस ठाणे येथे माहीती कळवुन ताब्यात घेतलेल्या आरोपींना चिंचवड पोलीस ठाणेकडील दाखल गुन्हयाचेकामी हजर केले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे मा. पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री आर आर पाटील , यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक श्री शैलेश गायकवाड, पोलीस उप निरीक्षक श्री एस डी निलपत्रेवार, पोलीस अंमलदार जयवंत राऊत, नामदेव राऊत, नामदेव कापसे , सायबर क्राईमचे सपोनि श्री राहुल नाईक व पोलीस अंमलदार नागेश माळी यांनी केली.